विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील
व्यक्तींना जाती प्रमाणपत्र देताना विचारात
घ्यावयाच्या पुराव्याबाबत

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- सीबीसी-१०/२००८/प्र.क्र.५६३/मावक-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०१ ऑक्टोबर , २००८

वाचा :- १) शासन निर्णय,सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
क्रमांक :-सीबीसी-१०/२००१/प्र.क्र. १२० /मावक-५, दिनांक १ -११-२००१
२) शासन निर्णय सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
क्रमांक :-सीबीसी-१०/२००१/प्र.क्र. १२० /मावक-५, दि. २८-१०-२००५.

**प्रस्तावना** :- संदर्भाधीन दिनांक १-११-२००१ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींना जाती प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे. विमुक्त जाती भटक्या जमातीची व्यक्ती ही उदरनिर्वाहासाठी समुहाने भटकंती करीत असल्याने त्यांच्या जातीबाबतच्या नोंदीचे कागदोपत्री पुरावे जातीचे प्रमाणपत्र देणा-या सक्षम प्राधिका-यांकडे सादर करु शकत नसल्याने ते मागासवर्गीय असून सुध्दा त्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळू शकत नाहीत. त्यांची अडचण दूर करण्यासाठी ते सध्या राहत असलेल्या ठिकाणच्या सरपंच आणि तलाठी यांनी त्या व्यक्तीच्या सध्याच्या रहिवासाबाबत तसेच जातीबाबत प्रमाणित केलेले जातीचे व वास्तव्याचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिका-याकडे सादर केल्यास तो पुरावा म्हणून विचारात घ्यावा अशाप्रकारचे आदेश संदर्भाधीन दिनांक २८-१०-२००५ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर आदेशामध्ये किंचित बदल करुन शासन खालील प्रमाणे सुधारित आदेश देण्यात येत आहे.

**शासन निर्णय** :- भटक्या व विमुक्त जातीच्या व्यक्ती उदरनिर्वाहासाठी सामुहिकरीत्या सातत्याने भटकंती करीत असल्यामुळे त्यांचेकडे त्यांच्या जातीची नोंद असलेला कागदोपत्री पुरावा उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे त्यांना जातीची प्रमाणपत्रे मिळविण्यामध्ये अडचणी येतात. सदर अडचणींचे निराकरण करण्याच्या हेतुने ते ज्या ठिकाणी वास्तव्य करीत असतील त्या गावच्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाने त्या व्यक्तींच्या वास्तव्य आणि जातीबाबत उपलब्ध कागदोपत्री पुरावे तपासुन, गृह चौकशी व तदानुषंगीक संदर्भ लक्षात घेऊन प्रमाणित केलेले प्रमाणपत्र सादर केल्यास सक्षम प्राधिकारी यांनी असे प्रमाणपत्र जातीचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी पुरावा म्हणून ग्राहय मानावे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००८१००११३४३५९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( ज. न. राठोड )
उपसचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव,
(कृ.मा.प.

RoTA/II 2096(1000-10-08)5

मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,
मा. उप मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,
सर्व मा. मंत्री / मा.राज्यमंत्री
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व अतिरिक्त आयुक्त (महसूल), नाशिक, मुंबई , पुणे, नागपूर, औरंगाबाद, अमरावती
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग संचालनालय, महा
राज्य, पुणे
आयुक्त, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
सर्व जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
सर्व उपविभागीय अधिकारी ( महसूल ),
सर्व उपजिल्हाधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग.

त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / कार्याल
प्रमुख यांना याबाबतच्या सूचना द्याव्यात.

निवड नस्ती - कार्यासन-मावक-५.